ePaper

पिंपरीतील बौध्दनगर परिसरात गॅस गळती होऊन झालेल्या स्फोटात 5 जण जखमी

वर्ष - 8 I अंक - 45 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 21 ऑगस्ट 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- गांगुलीने कठोर शिक्षा देण्याची मागणी
- युवराज सिंगचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडला!
- कंगनाने सांगितला 'तो' किस्सा
- अधिकारी भरतीवरून मतभेद उफाळले!


## "फास्ट ट्रॅक कोर्ट नको

# आरोपीला भरचौकात फाशी द्या!

## बदलापूर स्थानकात आंदोलकांच्या मागणीला जोर!

। ठाणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बदलापूरमधील आदर्श शिक्षण संस्थेच्या शाळेत १३ ऑगस्ट रोजी दोन लहान मुलींवर शाळेतील शिपायाकडून लैंगिक अत्याचार झाला. सदर प्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांकडून दिरंगाई केली गेली. त्यानंतर संतापलेल्या पालकांनी आज बदलापूर रेल्वे स्थानक आणि आदर्श शाळेच्या बाहेर आंदोलन सुरू केले. सकाळी दहा वाजल्यापासून हे रेल्वे स्थानकावर आंदोलन सुरू असून, यामुळे बदलापूर ते कर्जत लोकलसेवा ठप्प झाली आहे. दरम्यान, आंदोलक क्षणाक्षणाला आक्रमक होत असून आरोपीला आत्ताच भरचौकात फाशी द्या, अशी मागणी जोर धरू लागली आहे.**



या प्रकरणात आम्ही सर्वजण रस्त्यावर उतरोल म्हणून सरकारने हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टाच चालवण्याचं आश्वासन दिलं. आम्ही रस्त्यावर उतरलो नसतो तर हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात गेलं असतं का? इतर राज्यात जे घडतं ते आम्हाला आमच्या राज्यात घडवायचं नाही. त्यामुळे या प्रकरणी आम्ही सरकारला फक्त सात दिवसांची मुदत देतोय. आम्ही सात दिवस इथून हलणार नाहीत, असं एका आंदोलनकर्त्याने म्हटलं. तर, "आम्हाला आता आमच्या मुलींना बाहेर सोडायची भीती वाटतेय. शाळेत सोडायची भीती वाटते. आम्हाला सुरक्षेची चिंता आहे. त्यामुळे हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टातही नको, सात दिवसांची मुतदही नको. आजच आरोपीला भरचौकात फाशी द्या", अशी संतप्त प्रतिक्रिया एका महिला आंदोलनकर्त्याने दिली.

रेल्वे स्टेशनवर आंदोलनकर्त्यांनी रेल रोको केल्याने वांगणी ते कर्जत, खोपोली या भागातून ठाणे, मुंबईच्या दिशेने येणाऱ्या नोकरदारांना कामाच्या ठिकाणी पोहचता आले नाही. सकाळी आंदोलन तीव्र झाल्याने बदलापूर पल्ल्याड नागरिकांनी घरातून काम करण्याचा निर्णय घेतला. रेल्वे प्रशासनाने अंबरनाथ ते सीएसएमटी पर्यंत उपनगरीय रेल्वेगाड्यांची वाहतूक सुरू ठेवली होती. तर कर्जत मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या रेल्वेगाड्यांची वाहतूक पनवेल मार्गे वळविण्यात आली. दुपारनंतरही हा रेल रोको कायम होता. त्यामुळे काही रेल्वेगाड्या रद्द होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### "दादाने माझे कपडे काढले"...

**बदलापूर येथील आदर्श शाळेत गेल्या आठवड्यात तीन वर्षांच्या दोन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचे समोर आले होते. पालकांना हा प्रकार समजल्यानंतर त्यांनी वैद्यकीय तपासणी केली. मात्र पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यासाठी १२ तास लावले आणि शाळा प्रशासनानेही घटनेकडे दुर्लक्ष केल्याने शहरात संतापाची लाट पसरली. दरम्यान, या प्ररकणातील एका मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणासंदर्भात एफआयआरमध्ये नोंदवलेली माहिती समोर आली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.** एफआयआरनुसार, ही घटना १३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते १२ वाजेच्या दरम्यान घडली. दोन मुलींपैकी एका मुलीच्या कुटुंबाला १३ ऑगस्ट रोजी संशय आला, त्यांनी दुसऱ्या मुलीच्या कुटुंबातील सदस्याशी बोलल्यानंतर आपण लैंगिक अत्याचाराची तक्रार करण्यास जात असल्याचे सांगितले. यानंतर मुलीच्या पालकांनी तिला वैद्यकीय चाचणीसाठी नेण्याचा निर्णय घेतला. वैद्यकीय अहवालात तिच्या हायमेनचा भंग झाल्याचे दिसून आले. मुलगी अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत होती. तिने तिच्या पालकांना सांगितलं की दादाने तिचे कपडे काढून तिच्या गुप्तांगाला स्पर्श केला.

### संपूर्ण बदलापूर उतरले रस्त्यावर

शहरातील काही राजकीय पक्ष आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी २० ऑगस्ट रोजी बदलापूर बंदची हाक देत आंदोलनाची हाक दिली होती. त्याला प्रतिसाद देत सकाळी सहा वाजल्यापासून शाळेबाहेर पालकांनी निदर्शने केली. यावेळी पोलीस आणि आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर आरोपीला तात्काळ फाशी देण्याची मागणी करत करत साडेअकराच्या सुमारास आक्रमक आंदोलकांनी शाळेत प्रवेश केला व वर्ग तसेच शालेय साहित्याची नासधूस केली. त्याचवेळेस काही आंदोलक रेल्वे स्थानकाकडे गेले व त्यांनी रुळांवर ठिय्या मांडला. बदलापूर रेल्वे सेवा संपूर्ण ठप्प झाली.

### सुरक्षित बहीण योजना द्या !

आंदोलनात महिला आणि तरुणींचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. राज्यात सुरू असलेल्या 'लाडकी बहीण' योजनेचा प्रचार सरकारकडून मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. मात्र 'लाडकी बहीण योजना, नको तर सुरक्षित बहीण योजना द्या' अशी मागणी करणारे फलक बदलापूरकरांनी यावेळी झळकविले.

# भोसरी’त महाविकास आघाडीमध्ये तिढा

## माजी नगरसेवक रवि लांडगे यांचा ठाकरे गटात प्रवेश

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपचा राजीनामा दिल्यानंतर दोन वर्षे कोणतीही राजकीय भूमिका न घेतलेले आणि भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या माजी नगरसेवक रवि लांडगे यांनी अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.**



त्यामुळे विधानसभा लढविण्यासाठीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केलेल्या अजित गव्हाणे यांच्या अडचणीत भर पडली आहे. रवि लांडगे यांच्या प्रवेशामुळे भोसरीतील महाविकास आघाडीत तिढा निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.शिवसेना-भाजप युतीमध्ये भोसरी मतदारसंघ हा शिवसेनेकडे होता. २००९ आणि २०१४ मध्ये शिवसेनेकडून सुलभा उबाळे यांनी निवडणूक लढविली. मात्र, त्यांचा पराभव झाल्याने २०१९ मध्ये हा मतदारसंघ भाजपकडे गेला. आता महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या दोन्ही पक्षांनी भोसरीवर दावा केला आहे. विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी तीव्र इच्छुक असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. गव्हाणे यांनी प्रचारही सुरू केल्याने भोसरी मतदारसंघ हा पवार गटाला मिळण्याची चर्चा सुरू झाली असतानाच भाजपच्या शहरातील स्थापनेपासून पक्षात कार्यरत असलेल्या आणि पिंपरी-चिंचवडमध्ये पक्षाची पाळेमुळे खोलवर रुजविणारे भाजपचे माजी शहराध्यक्ष दिवंगत अंकुश लांडगे यांचे पुतणे रवि लांडगे यांनी विधानसभा लढविण्यासाठी हातात मशाल घेतली आहे. ते २०१७ मध्ये महापालिकेवर बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून गेले होते.रवि लांडगे आणि त्यांचे कुटुंबीय हे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात भाजपचे सर्वात जुने, निष्ठावान म्हणून ओळखले जातात. महापालिकेत भाजपची सत्ता आल्यानंतर रवि लांडगे यांना पदांपासून वंचित रहावे लागले. स्थायी समितीचे अध्यक्षपद देण्याचा शब्द देण्यात आला. मात्र, ते विधानसभेला दावेदार होईल, या भीतीने ऐनवेळी स्थायी समितीचे अध्यक्षपद दिले नसल्याचे सांगितले जाते. त्यामुळे लांडगे यांनी दोन वर्षांपूर्वीच भाजपचा राजीनामा दिला होता. महाविकास आघाडीचे सरकार असताना ते उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संपर्कात होते. त्यामुळे ते राष्ट्रवादीत प्रवेश करतील अशी अटकळ बांधली जात होती. परंतु, अजित पवार हेच भाजपसोबत गेल्याने लांडगे यांची अडचण झाली. अखेर त्यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. त्यांची विधानसभेची जोरदार तयारी सुरू झाली आहे.महाविकास आघाडीतील शरदचंद्र पवार गटाकडून अजित गव्हाणे आणि ठाकरे गटाकडून रवि लांडगे हे उमेदवारीसाठी आग्रही आहेत. त्यामुळे भोसरीच्या जागेवरून महाविकास आघाडीत तिढा निर्माण होण्याची शक्यता आहे.

जनसंघापासून कुटुंबीयांनी भाजपची प्रामाणिकपणे सेवा केली. परंतु, आमदार महेश लांडगे हे भाजपमध्ये आल्यापासून पक्षाचा विचार बाजूला पडला. हुकुम, धडपशाही, सत्तेच्या गैरवापराला कंटाळून भाजपचा समविचारी पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाण्याचा निर्णय घेतला.

### गव्हाणे यांच्या अडचणीत भर

उमेदवारी दिली तर मी नक्कीच विधानसभेची निवडणूक लढविणार असल्याचेरवि लांडगे यांनी सांगितले.भोसरीतून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेल्या माजी नगरसेवक रवि लांडगे यांनी अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केलेल्या अजित गव्हाणे यांच्या अडचणीत भर पडली आहे. रवि लांडगे यांच्या प्रवेशामुळे भोसरीतील महाविकास आघाडीत तिढा निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# पुण्यात अल्पवयीन मुलीवर शाळेत अत्याचाराचा प्रयत्न

## पोलिसांनी केली आरोपी देवराज पदम आग्री याला अटक

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पुणे शहरातील भवानी पेठेतील एका शाळेत इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलीवर १९ वर्षीय तरुणाने १५ ऑगस्ट रोजी अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून या प्रकरणी आरोपी तरुणाला समर्थ पोलिसांनी अटक केली.**



देवराज पदम आग्री (वय १९) असे आरोपी तरुणांचे नाव आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी देवराज पदम आग्री आणि पीडित मुलगी हे दोघेही भवानी पेठेतील एकाच शाळेत शिक्षण घेत आहेत. या दोघांची ओळख असून १५ ऑगस्ट रोजी शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर पीडित मुलगी बॅग घेण्यासाठी गेली. त्यावेळी आरोपी मुलगा हा स्वच्छतागृह जवळ लपून बसला होता. त्या ठिकाणी पीडित मुलगी येताच तिचा हात पकडून स्वच्छतागृहामध्ये घेऊन गेला. तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य आरोपीने केले. त्यावेळी पीडित मुलाने आरोपीला धक्का देऊन तेथून पळ काढला. या संपूर्ण घटनेची माहिती पीडित मुलीने आईला सांगितली. या प्रकरणी पिडीत मुलीने आमच्याकडे फिर्यादी देताच आरोपी देवराज पदम आग्री याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आली.

### आरोपी तरुणाला अटक

इयत्ता सातवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलीवर १९ वर्षीय तरुणाने १५ ऑगस्ट रोजी अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून या प्रकरणी आरोपी तरुणाला समर्थ पोलिसांनी अटक केली. देवराज पदम आग्री (वय १९) असे आरोपी तरुणांचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी देवराज पदम आग्री आणि पीडित मुलगी हे दोघेही भवानी पेठेतील एकाच शाळेत शिक्षण घेत आहेत. त्यावेळी आरोपी मुलगा हा स्वच्छतागृह जवळ लपून बसला होता. त्या ठिकाणी पीडित मुलगी येताच तिचा हात पकडून स्वच्छतागृहामध्ये घेऊन गेला. तिच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य आरोपीने केले.

# भोसरी विधानसभा मतदारसंघात एकापाठोपाठ एक राजकीय भूकंप!

## गव्हाणेंच्या खांद्यावर बंदूक... लांडगेंची 'गोळी'; अन् विलास लांडे यांची 'राजकीय खेळी'

। पिंपरी चिंचवडः । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भोसरी विधानसभा मतदारसंघात गेल्या काही दिवसांपासून राजकीय भूकंप काही थांबायचं नाव घेत नाहीत. आधी अजित पवारांच्या राष्ट्रवादीला धक्का देत अजित गव्हाणे यांनी तुतारी हाती घेतली तर आता भाजपला मोठा धक्का देत ठाकरेंनी रवी लांडगे यांना गळाल लावल. मात्र भोसरीत होत असलेल्या या राजकीय भूकंपाच्या पाठीमागे नक्की कोण आहे? याच्या चर्चांना आता उधाण आला आहे.**




अजित दादांची साथ सोडणाऱ्या अजित गव्हाणेंच्या खांद्यावर 'बंदूक' आणि त्यामध्ये भाजपला रामराम ठोकनाऱ्या रवि लांडगे यांची 'गोळी'... अन् या दोघांच्या रणनितीमागे विलास लांडे यांची 'राजकीय खेळी' असल्याची चर्चा सुरु झाली आहे. पिंपरी-चिंचवडमधील राजकारणातील मातब्बर नेता असलेले माजी आमदार विलास लांडे हे स्वतः महायुतीत असल्याचे भासवून त्यांची महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवण्याच्या तयारी असल्याच्या चर्चांना आता पेव फुटला आहे.

२०१७ मध्ये भाजपाच्या तिकीटावर बिनविरोध निवडून आलेले रवि लांडगे यांनी आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आहे. महापालिकेत स्थायी समिती सभापती पद मिळाले नाही म्हणून स्थानिक नेते आणि त्यातही भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्यावर ते नाराज होते. नगरसेवकपदाचा कार्यकाळ संपत आला त्यावेळी ही नाराजी अधिक उफाळून आली. महापालिकेत प्रशासकीय राजवट लागू झाल्यानंतर रवि लांडगे यांनी तत्कालीन एकसंध राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्याशी जवळीक साधली. दोन वर्षांपूर्वीच त्यांनी भाजपाच्या सदस्यत्वाचा राजीनामा तत्कालीन प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्याकडे अधिकृतपणे पाठवला होता.

सध्यस्थितीला रवि लांडगे भाजपाच्या कोणत्याही पदावर किंवा प्राथमिक सदस्य देखील नाहीत. त्यामुळे रवि लांडगे यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षात प्रवेश केल्याने भाजपाला फटका बसेल अशी सुताराम शक्यता नाही. महायुतीविरोधात किंबहुना भाजपाविरोधात ही निवडणूक लढवायची असल्यामुळे दोनवर्षांपूर्वी राजीनामा दिलेल्या रवी लांडगे यांचब्या बंडामुळे भाजपाला फटका बसेल, असे शक्यता फार कमी आहे.

### विलास लांडे यांचा परिवार शरद पवारांच्या मंचावर

विलास लांडे हे सध्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीत आहेत. त्यांच्या सौभाग्यवती माजी महापौर मोहीनी लांडे आणि मुलगा माजी नगरसेवक विक्रांत लांडे हे जाहीरपणे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या व्यासपीठावर दिसत आहेत. इतकंच नाही तर अजित पवारांची साथ सोडताना अजित गव्हाणे यांनी आपण हे सगळं आपले राजकीय गुरु विलास लांडे यांना विचारूनच करत असल्याचं म्हंटल होतं. त्यामुळे लांडे हे प्रथमदर्शनी महायुतीत दिसत असले तरी त्यांची रणनिती महाविकास आघाडीसाठी सुरू आहे का? अशी चर्चा आता शहराच्या राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात सुरु झाली आहे.

दरम्यान, रवि लांडगे यांचा १५ ऑगस्ट रोजी वाढदिवस निमित्त अभिष्ठचिंतन कार्यक्रम झाला. त्यावेळी विलास लांडे यांनी केलेले वक्तव्य राजकीय संकेत देणारे आहे. "सध्या अजित आणि रवि दोघेही सक्षमपणे काम करीत आहेत. हे दोघे तयार आहेत, म्हणून मी थांबतो असे म्हटले. पण, मी अजून काही म्हातारा झालो नाही" हे वाक्य भोसरीसह पिंपरी-चिंचवडच्या राजकारणाची दिशा निश्चित करणारे आहे.

### विलास लांडे शरद पवार यांचे विश्वासू

विलास लांडे यांनी शरद पवार यांचा फोटो आपल्या देव्हाऱ्यात ठेवला आहे. याचा उल्लेख त्यांनी जाहीरपणे अनेकदा केला आहे. त्यामुळे ८० वर्षांच्या पवारांशी निष्ठा असल्याचे सांगणारे विलास लांडे राजकारणातून निवृत्ती घेतील, असे म्हणणे हे आज मितीला घाईचे ठरेल.

### विलास लांडे महाविकास आघाडीचा चेहरा, पवारांची न उमजणारी खेळी?

त्यामुळे शरद पवार यांच्यावर निष्ठा असणारे विलास लांडे हेच भोसरीतून निवडणुकीच्या रिंगणात महाविकास आघाडीकडून उतरू शकतात आणि महाविकास आघाडीला पिंपरी-चिंचवडमध्ये सर्वाधिक प्रभावी चेहरा मिळू शकतो. हाच शरद पवार आणि त्यांचा निकटवर्ती नेत्याचा 'मास्टर प्लान' असू शकतो. तोपर्यंत अजित गव्हाणे आणि रवि लांडगे यांच्यासह ठाकरे गटाच्या सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट ही मंडळी महायुतीविरोधात रान पेटवण्याचे काम करीत राहतील यात शंका नाही.

# महापालिकेच्या मुख्य अभियंतापदी संजय कुलकर्णी यांना बढती

## प्रवेश प्रक्रियेला चांगला प्रतिसाद, शहरातील सुमारे 10 हजार पालकांनी भरले अर्ज

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य अभियंता या पदावर पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांची नियुक्ती करणे, तसेच लेखा विभागाकडील पेन्शन विषयक कामकाज करण्यासाठी सेवानिवृत्त लेखाधिकारी राजू जठार यांची तात्पुरत्या कालावधीसाठी नियुक्ती करणे, यासह विविध विषयांना प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.**



महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेले विविध विषय आज प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आले होते. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये प्रशासक सिंह यांनी विविध विषयांना मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त तथा नगरसचिव चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेच्या मुख्य अभियंता -२ या पदावरून मुख्य अभियंता रामदास तांबे नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत. या रिक्त जागेवर नियुक्ती देण्यासाठी महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय नुसार सह शहर अभियंता (स्थापत्य) या पदावरील शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, शिस्तभंग आणि दायित्वाची माहिती, संगणक अर्हता इ. सेवाविषयक तपशील पडताळून सह शहर अभियंता संजय नारायण कुलकर्णी यांना शासन मान्यतेच्या अधिन तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत पदोन्नती समितीने सर्वानुमते शिफारस केली होती. त्यानुषंगाने आज प्रशासक शेखर सिंह यांच्या मान्यतेसाठी हा विषय विशेष बैठकीमध्ये ठेवण्यात आला होता, त्यास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली. तसेच महापालिकेच्या अस्थापानेवरून सेवानिवृत्त होणा-या तसेच मयत कर्मचा-यांचे सेवा निवृत्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी लेखा विभागाकडील मर्यादित मनुष्यबळ लक्षात घेता ६ महिने कालावधीसाठी एकत्रित मानधनावर सेवा निवृत्त लेखाधिकारी राजू जठार यांची नियुक्ती करण्याबाबतच्या विषयाला देखील प्रशासक शेखर सिंह यांनी आज मान्यता दिली.

### विशेष बैठकीतील मंजूर विषय

पिंपरी येथील अशोक थियटर परिसरातील रस्त्यांचे तसेच प्रभाग क्रमांक ९ मधील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे, महापालिकेच्या अग्निशमन विभागातील गट 'ड' संवर्गातील अग्निशमन विमोचक तथा फायरमन रेस्क्यूअर या पदांच्या परिक्षेसाठी येणा-या खर्चाची रक्कम संबंधित कंपनीस अदा करणे, रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यासाठी तसेच स्थापत्य विषयक कामे करण्यासाठी सल्लागार नियुक्त करणे, यशवंतराव चव्हाण स्मारक समितीस अनुदान अदा करणे अशा विविध विषयास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली.

# आम्ही सवलत नाही, संरक्षण मागतो



## भूमिका

**कोलकाता येथील आर जी कार वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील एका महिला निवासी डॉक्टरवर झालेल्या निर्घृण बलात्कार-हत्येची घटना एवढे तरी निश्चित सांगते आहे की, संपूर्ण भारतातील आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय कायद्याची तातडीची गरज आहे.**

इतरांची काळजी घेण्यासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या डॉक्टरांनाच भेडसावणाऱ्या असुरक्षिततेची दखल घेतली जाणे आवश्यक आहे. वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि सपोर्ट स्टाफसह डॉक्टर आणि आरोग्य सेवा कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण समुदायाचे संरक्षण महत्त्वाचे आहे. अत्यावश्यक आरोग्य सेवा प्रदान करण्यात गुंतलेल्या कोणालाही हिंसाचाराचा सामना करावा लागतो... भले तो एखाद्या रुग्णाच्या भावनाक्षुब्ध नातेवाईकांकडून होणारा हल्ला असेल, पण त्यातही जीव जाऊ शकतो.आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठी केंद्रीय कायदा लागू करा, या मागणीसाठीच देशभरच्या निवासी डॉक्टरांनी संप केला. कोलकात्याच्या घटनेनंतरचा हा आक्रोश स्पष्ट असूनही, धोरणकर्त्यांनी अद्याप कोणतीही हालचाल केलेली नाही. भारतीय राज्यघटनेनुसार सार्वजनिक आरोग्य आणि रुग्णालये हे राज्याचे विषय आहेत; ही वस्तुस्थिती या समस्येची गुंतागुंत वाढवते. केंद्र



सरकारतर्फे यापूर्वी एकदा 'आरोग्य सेवा कर्मचारी आणि क्लिनिकल आस्थापना (हिंसा आणि मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध) विधेयक – २०१९' या नावाचे मसुदा विधेयक प्रस्तावित करण्यात आले. त्यावर सूचना आणि हरकती मागविण्यात आल्या. तथापि, गृह मंत्रालयाने याबाबत पुढे न जाण्याचा निर्णय घेतला. कारण काय, तर 'इतर व्यावसायिक समुदायांना समान संरक्षण मिळण्याच्या संभाव्यतेबद्दल चिंता' – म्हणजे वैद्यक व्यवसायिकांच्या संरक्षणासाठी कायदा केलात तसा आमच्याहीसाठी करा, अशी मागणी अन्य प्रकारच्या व्यवसायींकडून होण्याची भीती! सर्वांना समान संरक्षण देणे हे राज्ययंत्रणेचे कर्तव्य आहेच, पण त्याआधी हे मान्य करणे महत्त्वाचे आहे की आरोग्यसेवा ही एक अत्यावश्यक सेवा आहे, इथे डॉक्टर वा अन्य कर्मचारी अनेकदा प्रचंड तणावाखाली काम करतात आणि या कर्मचाऱ्यांचा संबंध सर्वात असुरक्षित आणि भावनिकदृष्ट्या नाजुक अशा लोकांशी येतो, त्यांच्याशी हे कर्मचारी संवाद साधत असतात. हे वातावरण हिंसाचाराला जन्म देऊ शकते, ज्यामुळे कायदेशीर संरक्षणाची भक्कम चौकट अधिक निकडीची ठरते.डॉक्टर, परिचारिका आणि संबंधित पॅरामेडिकल कर्मचारी अनेकदा रुग्णांच्या सेवेला प्राधान्य देण्यासाठी स्वतःची सुरक्षा, आरोग्य आणि वैयक्तिक गरजांकडे दुर्लक्ष करतात. ते प्रचंड दडपणाखाली बरेच तास काम करतात, वारंवार स्वतःचा जीव धोक्यात घालतात. संरक्षणाची वास्तविक आणि सहज दिसणारी अशी गरज यांना गरज असूनही, आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना अद्याप त्यांना आवश्यक असलेले कायदेशीर संरक्षण मिळालेले नाही हे निराशाजनक आहे. राजधानी दिल्लीतील एका प्रमुख अध्यापन रुग्णालयात कार्यरत असलेला आणि देशभरातील अनेक राज्यांमध्ये सेवा देणारा आरोग्यसेवा व्यावसायिक म्हणून, मी स्पष्टपणे सांगू शकतो की गेल्या काही वर्षांत आरोग्यसेवा व्यावसायिकांवरील हिंसाचार चिंताजनक पातळीवर पोहोचला आहे. हिंसाचारात झालेली ही वाढ आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण नसण्याशी थेट कारणीभूत आहे. सध्या देशभरातील डॉक्टरांकडून सुरू असलेले आंदोलन हे आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी केंद्रीय संरक्षण कायदा लागू करण्याची मागणी करण्यासाठीच आहे. भारतातील आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांवरील हिंसाचाराला संबोधित करणाऱ्या कायद्यांच्या वाटचालीचा डोळस आढावा घेतल्यास एकसंधतेचा अभाव दिसून येतो. अनेक राज्यांनी आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी कायदे लागू केले आहेत; परंतु या समस्येकडे पाहण्याच्या राज्यांच्या दृष्टिकोनांत तफावत असल्यामुळे सध्या देशात दिसते आहे ते विसंगत आणि त्रुटींनी भरलेल्या कायद्यांचे पॅचवर्क. 'केरळ हेल्थकेअर सर्व्हिस पर्सन आणि हेल्थकेअर सर्व्हिस इन्स्टिट्यूशन्स (हिंसा प्रतिबंध आणि मालमत्तेचे नुकसान) सुधारणा कायदा-२०२३' हा सुधारित कायदा गेल्या वर्षी कर्तव्यावर असलेल्या वंदना दास या कनिष्ठ डॉक्टरच्या दुःखद हत्येनंतर लागू करण्यात आला.

## प्रासंगिक »

# पूर्वलक्ष्यी पंचाईत!

***आपल्या भूमीतून निघालेल्या खनिजांवर कर आकारण्याचा अधिकार राज्यांना मिळणे रास्त; पण तो २००५ पासूनच्या प्रभावाने देण्यामुळे काही पेच उद्भवू शकतात...***

राज्यांना त्यांच्या भूभागातून निघणाऱ्या खनिजावर कर आकारण्याचा अधिकार आहे या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे 'लोकसत्ता'ने स्वागत केले. त्यावर २९ जुलैच्या अंकात प्रकाशित ('निकालाच्या मर्यादा') संपादकीयात त्या निर्णयाचे महत्त्व अधोरेखित करतानाच सदर निर्णयाच्या त्या वेळी प्रतीक्षित एका मुद्द्याबाबतचे भाष्य हातचे राखून केले गेले. हा मुद्दा होता या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबतचा. सदर प्रकरणी केंद्राविरोधात खटले गुदरणाऱ्या राज्यांची मागणी होती या कराची वसुली पूर्वलक्ष्यी प्रभावाने करू दिली जावी, ही. त्याच वेळी केंद्राचे म्हणणे होते की हा कर उत्तरलक्ष्यी पद्धतीनेच वसूल केला जावा. राज्यांना पूर्वलक्ष्यी अंमलबजावणीत स्वारस्य कारण त्यांच्या डोळ्यासमोर सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने तरळू लागलेली वाढती महसूलसंख्या. ओडिशा, आदी राज्ये आधीच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने हरखून गेलेली होती.

रोजगारपूरक विकास कसा साधणार हा प्रश्न आज जगभरच्या अनेक देशांपुढे असला तरी, लोकसंख्येने- त्यातही तरुणांच्या लोकसंख्येत- अधिक असलेल्या आपल्या देशात तो प्राधान्याचा आहे. त्यामुळेच रोजगारपूरक ठरणाऱ्या कोणत्याही धोरणाचे स्वागतच आपल्या देशात होते.

# जाहीर झालेली 'इंटर्नशिप' योजना कशी असेल?

यंदाच्या (२०२४-२५) केंद्रीय अर्थसंकल्पात केलेली इंटर्नशिप (प्रशिक्षण योजना) संधीविषयीची मांडणी अशीच नवी वाट शोधणारी आहे, म्हणून तिचे स्वागत झाले. हे इंटर्नशिप धोरण आपल्या नव्या शैक्षणिक धोरणातल्या (एनईपी-२०२०) 'भाग २'मधील 'उच्च शिक्षणामधील विविध क्षेत्रात कामाच्या संधी उपलब्ध असणे' या विचारालाही पूरक आहे. म्हणजे नवीन शैक्षणिक धोरणातून जे होणे अपेक्षित आहे त्याला अर्थसंकल्पाचा म्हणजेच सरकारचा आर्थिक पाठिंबा आहे, हे चांगले आहे. परंतु या रोजगारपूरक धोरणाची वाटचाल कशी होणार, हे तपशिलाने पाहाणे गरजेचे आहे.केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे पाच वर्षात एक कोटी तरुणांना ५०० प्रमुख कंपन्यांतून इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, त्यांना दरमहा ५,००० रुपयांचे विद्यावेतन (स्टायपेंड) देण्यात येईल, कंपन्या सामाजिक




बांधिलकीच्या (सीएसआर) निधीतून ही योजना राबवू शकतील. याबद्दलचे कोणतेही प्रारूप वा आराखडा केंद्रीय अर्थसंकल्पात नाही, तसा तो असणे अपेक्षितही नव्हते. नवीन शैक्षणिक धोरण कामाच्या प्रत्यक्ष संधींचा उल्लेख असला, तरी या धोरणाच्या उपलब्ध मसुद्यातही इंटर्नशिपचा काही आराखडा नाही आणि आता अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर असा आराखडा संबंधित विभागांकडून तयार होणे अपेक्षित आहे. त्यामुळे पुढील सूचनावजा मुद्द्यांना सध्या वाव उरतो...१) इंटर्नशिपच्या योजनेत सहभागी होणे हे कंपन्यांना अनिवार्य नाही. मग कोणत्या कंपन्या यात स्वत:हून सहभागी होतील? या योजनेचे महत्त्व कंपन्यांना पटवून देण्यासाठी सरकारलाच पुढाकार घ्यावा लागेल. भविष्यात ही योजना इंटर्न्सनाच (प्रशिक्षणार्थींनाच) नव्हे तर त्या कंपन्यांना आणि सरतेशेवटी पूर्ण समाजालाच फायद्याची कशी ठरेल, हे समजावून द्यावे लागेल.(२) दरमहा ५,००० रुपये स्टायपेंडवर किती विद्यार्थी या योजनेचा लाभ घ्यायला तयार होतील? अनुभव, प्रशिक्षण हे ठरवलेल्या स्टायपेंडपेक्षा कसे मोलाचे आहे हे विद्यार्थ्यांना सांगावे लागेल. (३) गरजू विद्यार्थी ५,००० रुपये स्टायपेंडसाठी या योजनेत सहभागी होतीलही, परंतु कंपनीत ये-जा करण्यासाठीचा प्रवास खर्च, घर आणि कंपनी वेगवेगळ्या शहरांत असतील तर राहण्याचा / इतर गरजेचे खर्च यांचा ताळमेळ पाच हजार रुपयांत घालणे आव्हानात्मक असेल.(४) कंपनीत इंटर्नशिप केल्यावर, पुढील नोकरीसाठी हा 'कामाचा अनुभव' ग्राह्य धरला जाईल का? किंवा त्याला मान्यता, समाजात किंमत असेल का

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शाळेत दोन चिमुरड्यांवर लैंगिक अत्याचार

## 3 पोलिस, मुख्याध्यापकांसह शाळेचे कर्मचारी निलंबित

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बदलापूरमधील दोन चिमुरड्यांवर शाळेतच झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाचे तीव्र पडसाद उमटताना दिसत आहेत. संतप्त पालक आणि आंदोलकांनी रुळांवरुन उतरत रेल्वे वाहतूक बंद पाडली आहे. सकाळी जवळपास दहा वाजताच्या सुमारास सुरु झालेलं हे आंदोलन सुरु आहे. त्यामुळे मध्य रेल्वेवरील लोकलसह लांब पल्ल्याच्या गाड्यांचाही खोळंबा झाला आहे. अंबरनाथ आणि कर्जत दरम्यानच्या दोन्ही मार्गांवरील वाहतूक बंद असल्याने सर्वसामान्य प्रवाशांचे हाल होत आहेत. तर काही एक्स्प्रेस ट्रेनचे मार्ग वळवण्यात आले आहेत. सरकारचे प्रतिनिधी म्हणून मंत्री गिरीश महाजन बदलापूर रेल्वे स्थानकावर दाखल झाले. मात्र, येथे त्यांना जनतेच्या उद्रेकाचा सामना करावा लागला.**





बदलापूर शहरातील एका नमांकित शाळेत तीन वर्ष आठ महिने आणि सहा वर्ष वय असलेल्या दोन लैंगिक मुलींवर शिपायाने लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. चिमुकलीने आईला तिच्या गुप्तांगात त्रास होत असल्याचं सांगितलं. तिथे मुंग्या चावतात असं सांगितलं. त्यानंतर आईने चिमुकलीला डॉक्टरकडे नेलं आणि तिथे हा संपूर्ण प्रकार उघड झाला. आपल्या लेकीसोबत घडलेल्या घटनेनंतर पालकांना मोठा धक्का बसला. दुसरीकडे आणखी एका चिमुकलीने तिच्या पालकांना गुप्तांगाजवळ त्रास होत असल्याचं सांगितलं. तसंच ती मुलगी शाळेत जाण्यासाठीही तयार होत नव्हती. खोलवर जात पालकांनी याचा तपास केल्यानंतर त्यांना आपल्या लेकीसोबत काय घडलं हे समजलं. ही घटना समोर आली आणि संपूर्ण बदलापूर हादरलं. या घटनेची तक्रार नोंदवण्यास विलंब झाल्यानंतर शाळेतील पालकांच्या संतापाचा उद्रेक झाला. याबाबत पालकांसोबत सर्वसामान्य जनताही रस्त्यावर उतरली. आधी सकाळी शाळेसमोर तीव्र निदर्शने करण्यात आली, त्याच वेळी आंदोलक रेल्वे स्थानकावर पोहोचले आणि ट्रॅकवर उतरले. त्यामुळे सकाळपासूनच लोकलचा खोळंबा झाला होता. ज्या शाळेत ही घटना घडली, त्या शाळेत तोडफोड करण्यात आली. शाळेची तोडफोड करण्यामध्ये महिला आंदोलकही सहभागी आहेत. लोकांनी शाळेत घुसत शाळेची तोडफोड केली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. चिमुकल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जनता रस्त्यावर उतरल्यानंतर आता सरकारने हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवण्याचे आदेश दिले आहेत. त्याच वेळी आंदोलकांनी बदलापूर रेल्वे स्टेशन येथे पोलिसांवरही दगडफेक सुरु केली. पालक आक्रमक झाले असून पोलिसांचा बंदोबस्त वाढला आहे. अशातच पोलिसांकडून आंदोलकांना हटवण्याचा प्रयत्न सुरु होता. पण बदलापूर स्टेशनवर आंदोलकांकडून थेट दगडफेक सुरु झालीये. त्यामुळे या आंदोलनाला हिंसक वळण लागले आहे. सकाळपासूनच घटनेच्या निषेधार्थ आंदोलकांनी बदलापूर रेल्वे स्टेशनवर ठिय्या दिला होता. पोलीस आंदोलकांना समजावून सांगत होते, मात्र आंदोलक काही केल्या ऐकायला तयार नव्हते. आरोपीला फाशी द्या, अशा घोषणा आंदोलक देत होते. जवळपास तासभर प्रयत्न करूनही आंदोलक रेल्वे ट्रॅकवरून उठत नसल्याचे पाहून पोलिसांनी जरासे आक्रमक झाले. त्याचवेळी आंदोलकांनी देखील रौद्र रुप धारण करून पोलिसांच्या दिशेने दगडफेक केली. शिशुवर्गात शिकणाऱ्या दोन चिमुकलींवर शाळेतील सफाई कामगार अक्षय शिंदे याने अत्याचार केल्याची घटना शनिवारी समोर आली. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात तसेच इतर तपासाच्या आणि वैद्यकीय बाबींमध्ये आणि आरोपीला पकडण्यात बदलापूर पूर्व पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक शुभदा शितोळे आणि पोलिस प्रशासनाने उदासीन भूमिका घेत विलंब केल्याचा आरोप काही सामाजिक आणि राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांनी केला होता. मंगळवारी सकाळी बदलापूर स्टेशनवर हजारो महिलांनी एकत्र येऊन घटनेचा निषेध व्यक्त केला. यावेळी महिलांनी लोकल ट्रेन रोखून धरल्या तसेच रिक्षा चालकांनीही रिक्षा बंद ठेवून आंदोलनाला पाठिंबा दिला. सकाळपासून रेल्वे ट्रॅकवर सुरू असलेल्या आंदोलनाची दखल घेण्यासाठी मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्त रवींद्र शिसवे आले.

### रविंद्र चव्हाण यांचा राजीनामा

त्यांनी आंदोलकांच्या मागण्या जाणून घेऊन सरकारपर्यंत तुमच्या भावना पोहोचवतो, असे सांगितले. आंदोलकांना हात जोडून विनंती करताना अनेक विद्यार्थी, आजारी रुग्णांची गैरसोय होत असल्याचे सांगत आपण ट्रॅकवरून बाजूला व्हावे, अशी विनंती शिसवे यांनी आंदोलकांना केली. मात्र आंदोलक ऐकायला तयार नव्हते. आरोपीला फाशी द्या, अशा जोरदार घोषणा आंदोलकांकडून सुरू होत्या. आंदोलक ऐकत नसल्याचो पाहून पोलिसांनी काहीसा आक्रमक पवित्रा घेतला.

---

# उद्धव ठाकरेंच्या गळ्यात काँग्रेसचं उपरणं!

## भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांची उद्धव ठाकरेवर बोचरी टीका

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राजीव गांधी सद्भावना दिवस कार्यक्रमात एक असं चित्र पाहण्यास मिळालं जे महाराष्ट्र विसणार नाही. या कार्यक्रमात महाविकास आघाडीचे दोन घटक पक्ष म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनाही बोलवण्यात आलं होतं.**





या कार्यक्रमात उद्धव ठाकरेंच्या गळ्यात काँग्रेसचं उपरणं पाहण्यास मिळालं. काँग्रेसच्या आजच्या सद्भावना दिवस कार्यक्रमात उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी उपस्थिती लावली. त्यावेळी काँग्रेस नेत्यांनी उद्धव ठाकरेंच्या गळ्यात काँग्रेस पक्षाचे उपरणं घातलं. काही वेळ ते उपरणं उद्धव ठाकरेंनी तसंच ठेवलं. तसंच हसत हसत त्यांनी नाना पटोले आणि मल्लिकार्जुन खरगेंशी गप्पाही मारल्या. पण नंतर शरद पवारही त्या कार्यक्रमात आले. सुरूवातीला शरद पवारांनी काँग्रेसचे उपरणे घालण्यास नकार दिला. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही त्यांच्या गळ्यातील उपरणं काढलं आणि बाजूला ठेवलं. त्यावेळी काँग्रेसचे आमदार भाई जगतापांनी ते उपरणं गळ्यातच ठेवावं असा आग्रह उद्धव ठाकरेंना केला. मात्र उद्धव ठाकरे यांनी हसत हसत त्याला नकार दिला. मात्र संजय राऊतांनी त्यांच्या गळ्यातील उपरणं कायम ठेवलं. काही वेळाने शरद पवारांनीही काँग्रेस पक्षाचं उपरणं गळ्यात घातलं. ही सगळी दृश्यं कॅमेरात कैद झाली आहेत. उद्धव ठाकरे ज्यावेळी भाषणासाठी उभे राहिले त्यावेळी त्यांनी यावर काँग्रेसच्या उपरण्यावर भाष्य केलं. भाषणाची सुरुवात त्यांनी, काँग्रेसचे असलात तरीही जमलेल्या माझ्या बंधूनो, भगिनींनो आणि मातांनो” अशी केली. तसंच म्हणाले, “मी आज खरंच काँग्रेसच्या कार्यक्रमाला आलो आहे हे बघायला स्वतःला चिमटा काढून पाहिला. काँग्रेसच्या कार्यक्रमाला असल्याने मी गळ्यात गमछा घातला. तुमचा आदर ठेवला, मान ठेवला.

### काँग्रेसचे उपरणे स्वतःच्या गळ्यात

मी इकडे तिकडे काय करतो त्यांच्याकडे त्यांचं जास्त लक्ष असतं. कारण समोरच्यांचं काही कर्तृत्व नाही. दाखवा काय दाखवायचं ते, असं उद्धव ठाकरे म्हणाले.ज्या बाळासाहेब ठाकरे यांची सगळी हयात काँग्रेसी विचारधारेच्या विरोधात गेली, ज्यांच्या विरुद्ध लढण्यासाठी रक्ताचं पाणी आणि हाडाची काडं करून शिवसेना स्थापन केली, रुजवली आणि वाढवली; त्याच बाळासाहेबांचे सुपुत्र उद्धव ठाकरे हे केवळ राजकीय स्वार्थासाठी काँग्रेसचे उपरणे गळ्यात घालून बसले आहेत. आपली मूळची विचारधारा काँग्रेसच्या पायात आणि काँग्रेसचे उपरणे स्वतःच्या गळ्यात, अशी अवस्था आता उद्धव ठाकरे यांची झाली आहे.

# बाबा तुमची स्वप्नं तीच माझीही स्वप्न!

## राजीव गांधींच्या जयंतीनिमित्त व्यक्त केल्या भावना!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने आज काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून त्यांना अभिवादन केलं जात आहे. राजीव गांधी यांच्याबद्दलच्या आठवणी ताज्या करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर शेअर केल्या जात आहेत. राजीव गांधींचे पुत्र व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या वडिलांसाठी एक्सवर पोस्ट शेअर केली असून त्यात आपल्या वडिलांची स्वप्न आपली मानून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं राहुल गांधींनी नमूद केलं आहे.**



"एक करुणामय व्यक्तिमत्व, सौहार्द व सद्भावनेचं प्रतीक", अशी उपमा राहुल गांधींनी आपल्या वडिलांसाठी पोस्टमध्ये नमूद केली आहे."बाबा, तुमची शिकवण माझी प्रेरणा आहे. भारतासाठीची तुमची स्वप्नं तीच माझीही स्वप्न आहेत. तुमच्या आठवणी सोबत घेऊन मी ती स्वप्नं पूर्ण करेन", असं कराहुल गांधींनी वडिलांसाठी केलेल्या पोस्टमध्ये नमूद म्हटलं आहे. आज सकाळी राहुल गांधींनी दिल्लीतील वीर भूमीला भेट दिली. तसेच, राजीव गांधींना त्यांच्या जयंतीदिनी आदरांजली वाहिली.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्यसभा खासदार जयराम रमेश यांनीही देशाच्या राजकीय व तंत्रज्ञानविषयक पटलावरील विकासात राजीव गांधींच्या योगदानाचा सोशल पोस्टमध्ये उल्लेख केला.आज राजीव गांधींची ८०वी जयंती आहे. त्यांचं राजकीय जीवन अल्पकालीन पण अत्यंत प्रभावी ठरलं. १९८५ च्या अर्थसंकल्पात अर्थविषयक धोरणांचा एक नवा दृष्टीकोन मांडण्यात आला होता. या अर्थसंकल्पात राजीव गांधींची महत्त्वाची भूमिका होती. राजीव गांधींच्या हत्येपूर्वी काही आठवडे त्यांनी १९९१ च्या निवडणुकांसाठीच्या जाहीरनाम्यावर बरंच काम केलं होतं. त्यातील आर्थित तरतुदींच्या पार्श्वभूमीवर नरसिंग राव-मनमोहन सिंग यांनी जुलै १९९१ मध्ये देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक सुधारणा राबवल्या", असं रमेश यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधींनी १९८४ साली काँग्रेसची सूत्रं हाती घेतली. अवघ्या ४०व्या वर्षी राजीव गांधी देशाचे पंतप्रधान झाले. राजीव गांधी हे भारताचे सर्वात कमी वयाचे पंतप्रधान ठरले. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूच्या श्रीपेरुम्बुदुरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रचारसभेत राजीव गांधींची एलटीटीईच्या हस्तकांनी सुसाईड बॉम्बेच्या सहाय्याने हत्या केली. एक करुणामय व्यक्तिमत्व, सौहार्द व सद्भावनेचं प्रतीक", अशी उपमा राहुल गांधींनी आपल्या वडिलांसाठी पोस्टमध्ये नमूद केली आहे."बाबा, तुमची शिकवण माझी प्रेरणा आहे. भारतासाठीची तुमची स्वप्नं तीच माझीही स्वप्न आहेत. तुमच्या आठवणी सोबत घेऊन मी ती स्वप्नं पूर्ण करेन", असं कराहुल गांधींनी वडिलांसाठी केलेल्या पोस्टमध्ये नमूद म्हटलं आहे. आज सकाळी राहुल गांधींनी दिल्लीतील वीर भूमीला भेट दिली. तसेच, राजीव गांधींना त्यांच्या जयंतीदिनी आदरांजली वाहिली.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्यसभा खासदार जयराम रमेश यांनीही देशाच्या राजकीय व तंत्रज्ञानविषयक पटलावरील विकासात राजीव गांधींच्या योगदानाचा सोशल पोस्टमध्ये उल्लेख केला.आज राजीव गांधींची ८०वी जयंती आहे. त्यांचं राजकीय जीवन अल्पकालीन पण अत्यंत प्रभावी ठरलं. १९८५ च्या अर्थसंकल्पात अर्थविषयक धोरणांचा एक नवा दृष्टीकोन मांडण्यात आला होता. या अर्थसंकल्पात राजीव गांधींची महत्त्वाची भूमिका होती. राजीव गांधींच्या हत्येपूर्वी काही आठवडे त्यांनी १९९१ च्या निवडणुकांसाठीच्या जाहीरनाम्यावर बरंच काम केलं होतं. त्यातील आर्थित तरतुदींच्या पार्श्वभूमीवर नरसिंग राव-मनमोहन सिंग यांनी जुलै १९९१ मध्ये देशात मोठ्या प्रमाणावर आर्थिक सुधारणा राबवल्या", असं रमेश यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे.इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधींनी १९८४ साली काँग्रेसची सूत्रं हाती घेतली.

### राजीव गांधी सर्वात कमी वयाचे पंतप्रधान

राजीव गांधी हे भारताचे सर्वात कमी वयाचे पंतप्रधान ठरले. २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूच्या श्रीपेरुम्बुदुरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रचारसभेत राजीव गांधींची एलटीटीईच्या हस्तकांनी सुसाईड बॉम्बेच्या सहाय्याने हत्या केली.भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने आज काँग्रेसचे नेते, कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांकडून त्यांना अभिवादन केलं जात आहे. राजीव गांधी यांच्याबद्दलच्या आठवणी ताज्या करणाऱ्या पोस्ट सोशल मीडियावर शेअर केल्या जात आहेत. राजीव गांधींचे पुत्र व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या वडिलांसाठी एक्सवर पोस्ट शेअर केली असून त्यात आपल्या वडिलांची स्वप्न आपली मानून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं राहुल गांधींनी नमूद केलं आहे.

# थेट अधिकारी भरतीवरून मतभेद उफाळले!

## चिराग पासवान भाजप सरकार विरोधकांच्या सोबत

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**वैचारिक मतभेद असणाऱ्या पक्षांना सोबत घेऊन बनवलेले कुबड्यांचे केंद्र सरकार चालवताना आज पहिला मिठाचा खडा पडला असून सनदी अधिकाऱ्यांच्या थेट भरतीला मंत्री चिराग पासवान यांनी जोरदार हरकत घेतली आहे. आपल्याच मंत्र्याने विरोधी पक्षाच्या सुरत सूर मिसळल्यामुळे भाजपमधील धुरीण यांना झटका बसला असून मित्रपक्षांच्या विरोधाची संख्या आणखी वाढत जाण्याची भाजपला भीती आहे.**



'केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे (यूपीएससी) सनदी अधिकाऱ्यांची भरती करण्याऐवजी केंद्र सरकार थेट भरती (लॅटरल एंट्री) करीत असल्याने आरक्षण धोक्यात आले आहे,' या विरोधकांच्या भूमिकेत आता केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांनीही सूर मिसळला आहे. चिराग पासवान हे लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास) अध्यक्ष आहेत. त्यांचा पक्ष भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (एनडीए) घटकपक्ष आहे. 'यूपीएससी'ने गेल्या शनिवारी ४५ पदांवरील थेट भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली. त्यात दहा सहसचिव आणि संचालक, उपसचिवांच्या ३५ पदांचा समावेश आहे. संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची सरकारी विभागांत भरती करण्याची ही योजना आहे. मात्र, ती चिंता करायला लावणारी असून, त्याबाबतचा विरोध केंद्र सरकारपर्यंत निश्चितपणे पोहोचविणार असल्याचे पासवान यांनी म्हटले आहे. या योजनेमुळे दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीयांच्या आरक्षणावर घाला येत आहे, असा आरोप लोकसभेती विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रविवारी केला होता. दरम्यान, 'लॅटरल एंट्री' वरून विरोधकांनी आवाज उठविला असतानाच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि केंद्रीय मंत्रीही या योजनेच्या समर्थनासाठी मैदानात उतरले आहेत.

### योजना चिंता वाढविणारी

केंद्रीय मंत्री अश्वनी वैष्णव यांनी काँग्रेस याबाबत दिशाभूल करीत असल्याचे म्हटले आहे. 'या योजनेमुळे देशभरात विविध सेवांमध्ये भरती होण्यासाठीच्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या आरक्षणावर कोणताही बदल होणार नाही,' असे वैष्णव यांनी म्हटले आहे. काँग्रेसच्या कार्यकाळात १९७०पासून ही योजना राबविली जात आहे. संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची सरकारी विभागांत भरती करण्याची ही योजना आहे. मात्र, ती चिंता करायला लावणारी आहे. या योजनेचा अनुसूचित जाती,जमाती आणि इतरांना मोठा फटका बसू शकतो.

# जेव्हा वडिलांनी दुसरे लग्न केले तेव्हा : अरबाज



बॉलीवूडचे कलाकार हे सतत कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी आपल्या चित्रपटामधील भूमिकेमुळे, कधी सोशल मिडियावर शेअर केलेल्या फोटो किंवा व्हिडीओमुळे तर कधी त्यांच्या व्यक्तव्यामुळे हे कलाकार चर्चाचा भाग बनताना दिसतात. आता अरबाज खानने जेव्हा वडील सलीम खान यांनी दुसरे लग्न केले तेव्हा त्यांच्या आईची प्रतिक्रिया काय होती, हे सांगितले आहे.सलीम खान आणि जावेद अख्तर यांच्या आयुष्यावर आधारित 'अँग्री यंग मेन' ही डॉक्युमेंटरी प्राइम व्हिडीओवर प्रदर्शित झाली आहे. या डॉक्युमेंटरीमध्ये सलीम खान यांनी जेव्हा सलमा खान यांच्याबरोबर लग्न झालेले असताना जेव्हा अभिनेत्री हेलन यांच्याबरोबर दुसरे लग्न केले, त्यावेळी सलमा खान यांनी ती परिस्थिती कशी हाताळली आहे, हे पाहायला मिळते.अरबाज खानने वडिलांनी जेव्हा दुसरे लग्न केले होते, त्यावेळची आठवण सांगितली आहे. तो म्हणतो, "माझी आई सलमा खानने वडिल सलीम खान किंवा हेलन आंटी यांच्याबरोबर वाईट वागण्यास कधीही प्रभावित केले नाही. त्या काळात तिला त्रास झाला पण तुझे वडील वाईट आहेत किंवा असे वागत आहेत, असे तिने आम्हाला कधीही सांगितले नाही. आम्ही आजही आमच्या वडिलांच्या दुसऱ्या पत्नीला हेलन आंटी अशी हाक मारतो, कारण त्यावेळी ती हेलन आंटी होती. पण आईसारखीच वागणूक तिलाही देतो. ती आमच्या आयुष्याचा महत्वाचा भाग आहे. ती आमच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टीचा भाग व्हावी, यासाठी माझ्या आईने प्रयत्न केले आहेत." अशी आठवण अरबाज खानने सांगितली आहे. याबरोबरच, सलीम खान यांनी हेलेन यांच्याशी लग्न केल्याची बातमी कशी सांगितली, याचा खुलासादेखील त्यांनी या डॉक्युमेंटरीमध्ये केला आहे. मी माझ्या मुलांना खाली बसवले, त्यांच्याशी चर्चा केली. त्यांना म्हटलं, तुम्हाला आता ही गोष्ट समजणार नाही पण, ज्यावेळी तुम्ही मोठे व्हाल त्यावेळी तुम्हाला समजेल. तुम्ही तुमच्या आईवर जितके प्रेम करता तितकं तुम्ही हेलनवर करू शकणार नाही पण मला तिच्यासाठी तुमच्याकडून तेवढाच आदर हवा आहे. कारण प्रेम हे आदर करण्यात असते, असे अशी आठवण त्यांनी सांगितली आहे.दरम्यान, हेलन यांनीदेखील या डॉक्युमेंटरीमध्ये खान परिवाराकडून मिळालेल्या प्रेमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# कंगनाने सांगितला 'तो' किस्सा



बॉलीवूडची क्वीन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अभिनेत्री कंगना रणौत कधी वादग्रस्त विधानांमुळे तर कधी वैयक्तिक आयुष्यातील घटनांमुळे सोशल मीडियावर कायमच चर्चेत असतात. सध्या त्या चर्चेत येण्याचं कारण देखील तितकंच खास आहे. नुकतीच कंगना यांनी एक मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी नेहमीप्रमाणे बॉलीवूडवर टीका केली. तसंच आपल्या आजवरच्या चित्रपटाविषयी काही किस्से सांगितले. यावेळी कंगना यांनी 'मर्डर' चित्रपटासंबंधित एक किस्सा सांगितला.अभिनेत्री कंगना रणौत यांचा 'इमर्जन्सी' चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटाचं प्रमोशन करताना त्या दिसत आहेत. या चित्रपटानिमित्ताने कंगना यांनी राज शमानी यांच्या पॉडकास्टवर हजेरी लावली होती. यावेळी कंगना यांनी अनेक धमाल किस्से सांगितले. 'गँगस्टर' सिनेमातून कंगना यांनी बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं होतं. या सिनेमाच्या निर्मिती व दिग्दर्शनाची जबाबदारी अनुराग बासुने सांभाळली होती. या चित्रपटात कंगना इम्रान हाशमीबरोबर प्रमुख भूमिकेत झळकल्या होत्या. याच चित्रपटाबाबत सांगताना कंगना यांनी 'मर्डर' विषयी किस्सा सांगितला. त्या म्हणाल्या, "माझ्या घरच्यांना या इंडस्ट्रीबाबत फार माहित नव्हतं. जेव्हा मला अनुरागने 'मर्डर' सिनेमासाठी विचारणा केली. तेव्हा मी माझ्या वडिलांना सांगितलं की, 'गँगस्टर' ज्याने दिग्दर्शित केला आहे, तोच अनुराग 'मर्डर' सिनेमा करतोय आणि त्याने मला या सिनेमासाठी विचारलं आहे. हे ऐकताच माझे वडील खूप संतापले आणि थेट घरी यायला सांगितलं."पुढे कंगना म्हणाल्या, ""मर्डर'

# 'द डायरी ऑफ वेस्ट बंगाल' चित्रपटाचे दिग्दर्शक कोलकात्यातून बेपत्ता!

'द डायरी ऑफ वेस्ट बंगाल' या वादग्रस्त चित्रपटाचे दिग्दर्शक सनोज मिश्रा कोलकातामधून बेपत्ता झाल्याची माहिती समोर येत आहे. मिश्रा यांना कोलकाता पोलिसांनी त्यांच्या चित्रपटाशी संबंधित चौकशीसाठी बोलावले होते. पण ते शहरात आल्यापासून त्याचा फोन बंद आहे, त्यामुळे कुणाचाच त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही.या वर्षाच्या सुरुवातीला 'द डायरी ऑफ वेस्ट बंगाल' चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाल्यानंतर वाद सुरू झाला. चित्रपटात पश्चिम बंगालमधील हिंसाचार दाखवण्यात आला आहे, त्यामुळे या चित्रपटाला काही ठिकाणी विरोध होतोय. त्याचबरोबर सनोज मिश्रा यांना जीवे मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्या होत्या. चित्रपटामुळे राज्याची प्रतिमा खराब होत असल्याचा आरोप करत पश्चिम बंगाल पोलिसांनी त्यांना कायदेशीर नोटीस बजावली होती. न्यूज १८ ने याबद्दल वृत्त दिलंय.सनोज मिश्रा अचानक बेपत्ता झाल्याने त्यांचे कुटुंबीय खूप चिंतेत आहे. या चित्रपटामुळे धमक्या येत होत्या, त्याच प्रकरणात सनोज मिश्रा बेपत्ता झाले आहेत असं कुटुंबियांचं म्हणणं आहे. त्यांची पत्नी द्विती मिश्रा यांनी एबीपी लाईव्हला दिलेल्या मुलाखतीत पतीबद्दल चिंता व्यक्त केली. कोलकाता पोलिसांनी बोलावल्यानंतर सनोज १४ ऑगस्टच्या सकाळी घरातून निघाले. मिश्रा यांनी दुपारी फोन करणार असं सांगितलं होतं, पण कोलकात्याला गेल्यावर त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही, असं द्विती यांनी म्हटलंय. द्विती मिश्रा यांनी सांगितलं की सनोज यांना शेवटचं त्यांच्या पुतण्याने पाहिलं होतं. तो सनोज यांना सकाळी साडेसात वाजता विमानतळावर सोडायला गेला होता.पण ते कोलकात्यात गेल्यानंतर त्यांच्याशी संपर्क साधता आला नाही. दिवसभर फोनची वाट पाहिली, पण त्यांच्याबद्दल काहीच कळालं नाही, त्यामुळे त्यांनी संध्याकाळी पोलिसांत धाव घेतली.

# मी जिवंत आहे: अभिनेता श्रेयस तळपदे

अभिनेता श्रेयस तळपदेला १५ डिसेंबर २०२३ रोजी हृदयविकाराचा झटका आला. उपचारानंतर तो बरा झाला आणि आता ठणठणीत आहे, पण तरीही त्याला पोस्ट करून तो हयात असल्याचं स्पष्टीकरण द्यावं लागलं आहे. श्रेयसने इन्स्टाग्रामवर यासंदर्भात पोस्ट शेअर केली आहे. श्रेयसने लिहिलं, "मी जिवंत आहे, आनंदी आहे व निरोगी आहे हेच मी सर्वांना सांगू इच्छितो. माझ्या निधनाची माहिती देणाऱ्या एका व्हायरल पोस्टबद्दल मला कळालं. विनोद मी समजू शकतो, पण जेव्हा त्याचा गैरवापर केला जातो तेव्हा खरा त्रास होतो. एखाद्याच्या विनोदातून सुरू झालेली गोष्ट आता अनावश्यक काळजीचं निर्माण करत आहे, तसेच माझ्यासाठी काळजी करणाऱ्या लोकांच्या, खासकरून माझ्या कुटुंबाच्या भावनांशी खेळ होत आहे."माझी लहान मुलगी रोज शाळेत जाते, ती आधीच माझ्या आरोग्याबद्दल काळजीत आहे, ती सतत मला प्रश्न विचारत असते.

# कुठे आहे 'मोहरा'तीलअभिनेत्री?

'मोहरा' हा चित्रपट तुम्हाला आठवत असेल. अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि रवीना टंडन यांचा दमदार अभिनय यात पाहायला मिळाला होता. या चित्रपटातील 'टिप टिप बरसा पानी' आणि 'ना कजरे की धार' ही दोन गाणी खूप गाजली होती. ती आजही आपल्याला ऐकायला मिळतात. यातील कलाकार अजुनही इंडस्ट्रीत सक्रिय आहेत. पण तुम्हाला 'ना कजरे की धार'मधील आठवते का? यात ती सुनील शेट्टीसह रोमान्स करताना दिसली होती. तिने यात सुनीलच्या पत्नीची छोटीशी भूमिका केली होती. या अभिनेत्रीला इंडस्ट्रीत फारसं यश मिळालं नाही, ती शेवटची १२ वर्षांपूर्वी एका चित्रपटात साध्वीच्या भूमिकेत दिसली होती. ३० वर्षांनंतर ही अभिनेत्री सध्या काय करते ते जाणून घेऊयात.'मोहरा' चित्रपटातील 'ना कजरे की धार' या गाण्यात सुनील शेट्टीची पत्नी प्रिया अग्निहोत्रीची भूमिका अभिनेत्री पूनम झावरने साकारली होती. पूनम एका श्रीमंत कुटुंबातील आहे. तिने मॉडेल म्हणून करिअरला सुरुवात केली आणि नंतर अभिनयाकडे वळली. १९९४ साली प्रदर्शित

# युवराज सिंगचा वर्ल्ड रेकॉर्ड मोडला!

## सामोआच्या यष्टिरक्षक व्हिसरने एकाच षटकात 39 धावा केल्या

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**क्रिकेटच्या मैदानावर नेहमीच नवनवीन विक्रम होत असतात. असाच सिक्सर किंग युवराज सिंगचा एक दुर्मिळ विक्रम मोडीत काढला आहे. टीम इंडियाचा दिग्गज अष्टपैलू युवराज सिंगने जेव्हा इंग्लंडचा गोलंदाज स्टुअर्ट ब्रॉडच्या एका षटकात ३६ धावा केल्या, तेव्हा हा वर्ल्ड रेकॉर्ड झाला होता. मात्र आता हा विक्रम मोडीत निघाला आहे. आता सामोआ देशाचा यष्टिरक्षक फलंदाज डॅरियस व्हिसरने पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात एका षटकात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम मोडून इतिहास घडवला आहे. आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक उप-प्रादेशिक पूर्व आशिया-पॅसिफिक क्वालिफायर-ए स्पर्धेत सामोआच्या वानुआतू विरुद्धच्या सामन्यात व्हिसरने एकाच षटकात ३९ धावा केल्या.**




क्वालिफायर-ए सामन्याच्या १५व्या षटकात, व्हिसरने सहा गगनचुंबी षटकार ठोकले आणि वानुआतुचा वेगवान गोलंदाज नलिन निपिकोच्या तीन नो-बॉल्सनेही त्याला मदत केली. व्हिसरने भारताचा सिक्सर किंग युवराज सिंग याचा एका षटकात सर्वाधिक ३६ धावा करण्याचा विक्रम मागे टाकला आहे. २००७ मधील पहिल्या आयसीसी टी-२० विश्वचषकात इंग्लंडच्या स्टुअर्ट ब्रॉडच्या एका षटकात सहा षटकार मारण्याचा भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगच्या नावे आहे. कायरन पोलार्ड (२०२१ – ३६ धावा), निकोलस पूरन (२०२४ – ३६ धावा), दीपेंद्र सिंग आयरे (२०२४ – ३६ धावा) हे दिग्गज खेळाडूही मागे पडले आहेत. सामोआ हा देश मध्य दक्षिण पॅसिफिक महासागरामधील एक बेट आहे. ते न्यूझीलंड आणि हवाई यांच्या मध्यभागी वसलं आहे. नऊ बेटांच्या द्वीपसमूहापासून तयार झालं आहे. नऊपैकी चार बेटांवर लोकवस्ती आहे. सवाई आणि उपोलू ही दोन मोठी बेटं आहेत. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सामोआ क्रिकेट संघाची सामन्याची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर शॉन कॉटर (१४ धावा) आणि डॅनियल बर्जेस (१६ धावा) यांना मोठी कामगिरी करता आली नाही. त्यानंतर डॅरियस व्हिसरने जबाबदारी घेतली. त्याने अवघ्या ६२ चेंडूत १३२ धावा केल्या, ज्यात त्याने ५ चौकार आणि १४ षटकार लगावले. त्याच्यामुळेच समोआ क्रिकेट संघ १७४ धावांपर्यंत मजल मारण्यात यशस्वी ठरला.सामोआ क्रिकेट संघाचा फलंदाज डॅरियस विसर हा वानुआतु क्रिकेट संघाकडून नलिन निपिको १५वे षटक टाकत होता. या षटकात डेरियस व्हिसरने ६ षटकार ठोकले. पहिल्या ३ चेंडूंवर सलग सहा षटकार मारल्यानंतर त्याने शेवटच्या ६ चेंडूंवर आणखी ३ षटकार ठोकले. मात्र, नलिनने या षटकात ३ नो बॉलही टाकले. डेरियस व्हिसरने या सामन्यात एका षटकात एकूण ६ षटकार ठोकले आहेत. आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात एका षटकात ६ षटकार मारणारा तो जगातील चौथा फलंदाज ठरला आहे. डॅरियस व्हिसरच्या आधी युवराज सिंग, कायरन पोलार्ड आणि नेपाळच्या दीपेंद्र सिंग आयरी यांनी ही कामगिरी केली होती. क्वालिफायर-ए सामन्याच्या १५व्या षटकात, व्हिसरने सहा गगनचुंबी षटकार ठोकले आणि वानुआतुचा वेगवान गोलंदाज नलिन निपिकोच्या तीन नो-बॉल्सनेही त्याला मदत केली. व्हिसरनेकिंग युवराज सिंग याचा एका षटकात सर्वाधिक ३६ धावा विक्रम मागे टाकला आहे.

### एका ओव्हरमध्ये 6 षटकार

२००७ मधील पहिल्या आयसीसी टी-२० विश्वचषकात इंग्लंडच्या स्टुअर्ट ब्रॉडच्या एका षटकात सहा षटकार मारण्याचा भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंगच्या नावे आहे. कायरन पोलार्ड (२०२१ – ३६ धावा), निकोलस पूरन (२०२४ – ३६ धावा), दीपेंद्र सिंग आयरे (२०२४ – ३६ धावा) हे दिग्गज खेळाडूही मागे पडले आहेत.सामोआ हा देश मध्य दक्षिण पॅसिफिक महासागरामधील एक बेट आहे. ते न्यूझीलंड आणि हवाई यांच्या मध्यभागी वसलं आहे. नऊ बेटांच्या द्वीपसमूहापासून तयार झालं आहे. नऊपैकी चार बेटांवर लोकवस्ती आहे. सवाई आणि उपोलू ही दोन मोठी बेटं आहेत. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सामोआ क्रिकेट संघाची सामन्याची सुरुवात चांगली झाली नाही. सलामीवीर शॉन कॉटर (१४ धावा) आणि डॅनियल बर्जेस (१६ धावा) यांना मोठी कामगिरी करता आली नाही. त्यानंतर डॅरियस व्हिसरने जबाबदारी घेतली.

# सौरव गांगुलीने कठोर शिक्षा देण्याची मागणी

## कोलकाता प्रकरणावरील वक्तव्य सौरव गांगुलीला भोवलं

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली वादात सापडला आहे. कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणातील वक्तव्य आणि सोशल मीडियावर आलेल्या प्रतिक्रियांमुळे ट्रोल होत आहेत. यानंतर आता सौरव गांगुलीने पीडितेच्या समर्थनार्थ आपली एक्स प्रोफाईल बदलली आहे पण यानंतर त्याला टीकेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्याने काय वादग्रस्त वक्तव्य केले होते? ज्यामुळे त्याला आता निवेदन जारी करावे लागले आहे.**






आता कर्णधार सौरव गांगुलीने आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या क्रूर बलात्कार आणि हत्येविरोधात आवाज उठवला आहे. त्याने या घटनेच्या निषेधार्थ आणि न्यायाची मागणी करत असलेल्या लोकांच्या एकजुटीने सोशल मीडियावरील आपले प्रोफाइल पिक्चर्स 'ब्लॅक' केले आहेत. कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणानंतर संतापाची लाट उसळली आहे आणि एक ऑनलाइन मोहीम सुरू झाली आहे. ज्यात लोकांना निषेध म्हणून त्यांचे सोशल मीडिया प्रोफाइल पिक्चर्स 'ब्लॅक' करण्याचे आवाहन केले आहे. कोलकात्याच्या सुरक्षेबाबत केलेल्या वक्तव्यावर झालेल्या टीकेनंतर सौरव गांगुलीने आपला डीपी ब्लॅक केला आहे. या अगोदर त्याने जे वक्तव्य केले होते. ज्यामुळे सोशल मीडियावर त्याच्यावर मोठ्या प्रमाणात टीका झाली. त्याचे वक्तव्य हे गुन्ह्याचे गांभीर्य कमी करणारे असल्याचे चाहत्यांचे म्हणणे होते. रविवारी गांगुलीने स्पष्टीकरण जारी करत आपले विधान चुकीच्या अर्थाने घेतले असल्याचे म्हटले.

### सौरव गांगुली वादात सापडला

त्याचबरोबर तो स्वत: एका मुलीचा वडील असल्याने या घटनेबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली.भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली वादात सापडला आहे. कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणातील वक्तव्य आणि सोशल मीडियावर आलेल्या प्रतिक्रियांमुळे ट्रोल होत आहेत. यानंतर आता सौरव गांगुलीने पीडितेच्या समर्थनार्थ आपली एक्स प्रोफाईल बदलली आहे पण यानंतर त्याला टीकेला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे त्याने काय वादग्रस्त वक्तव्य केले होते? ज्यामुळे त्याला आता निवेदन जारी करावे लागले आहे.आता कर्णधार सौरव गांगुलीने आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या क्रूर बलात्कार आणि हत्येविरोधात आवाज उठवला आहे. त्याने या घटनेच्या निषेधार्थ आणि न्यायाची मागणी करत असलेल्या लोकांच्या एकजुटीने सोशल मीडियावरील आपले प्रोफाइल पिक्चर्स 'ब्लॅक' केले आहेत. कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणानंतर संतापाची लाट उसळली आहे.